मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd. No. 72105/99 · वर्ष २६ · अंक ३२२ · सातारा · शुक्रवार दि.२३ ऑगस्ट २०२४ · पाने ४ · किंमत ५/- रूपये

# प्रतापगड विकास प्राधिकरणाची स्थापना



## छत्रपती उदयनराजे भोसले अध्यक्षपदी

**सातारा :** प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणावर सहअध्यक्ष म्हणून साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या भूमीला खूप मोठा इतिहास आहे. दरम्यान महाराष्ट्र सरकारने प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे. प्रतापगड किल्ल्याला फार मोठा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याला आदिलशहाचा सरदार अफजलखान याचा वध केला होता. त्या प्रतापगडाच्या विकासासाठी राज्य सरकारने प्राधिकरणाची स्थापना केली आहे. भाजप खासदार छत्रपती उदयनमहाराज भोसले हे या प्राधिकरणाचे अध्यक्ष असणार आहेत.

राज्य सरकारने प्रतापगड किल्ल्याच्या विकासासाठी प्राधिकरणाची स्थापना केली आहे. छत्रपती उद्यानमहाराज भोसले या प्राधिकरणाचे अध्यक्ष असणार आहेत. तसेच प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणावर सहअध्यक्ष म्हणून साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर निमंत्रित सदस्य म्हणून विजय नायडू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य सरकारने याबाबतचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा अधिकृत निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

प्रतापगड किल्ल्याचे बांधकाम हे छत्रपती शिवाची महाराजांच्या काळात १६५६ मध्ये करण्यात आले. १० नोव्हेंबर १६५९ मध्ये प्रतापगडाच्या पायथ्याशी सरदार अफजलखान याचा वध केला होता. ही एक मोठी ऐतिहासिक घटना आहे. अशा या ऐतिहासिक किल्ल्याच्या विकासासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. उदयनराजे भोसले यांना या प्राधिकरणाचे अध्यक्ष करण्यात आले आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने याबाबतचे आदेश काढले आहेत.

# माता भगिनी सुरक्षित असतील तरच लाडकी बहीण योजनेला अर्थ : उद्धव ठाकरे

**मुंबई:** बहीण सुरक्षित असेल तर लाडकी बहीण योजनेला अर्थ आहे. शाळेत विद्यार्थिनी असुरक्षित असतील तर मुलगी शिकली, प्रगती झाली.. अशा घोषणांना काय अर्थ राहतो, असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. बदलापूर लैंगिक अत्याचारांच्या निषेधार्थ मथहाविकास आघाडीने २४ तारखेला पुकारलेला बंद राजकीय स्वरूपाचा नसून माता-भगिनींच्या सुरक्षिततेबाबत सजग आहोत हे दाखवण्यासाठी सर्वांनी या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कोरोना संकटाच्या काळात संपूर्ण महाराष्ट्राने एक कुटुंब असल्यासारखे एकत्र येऊन संकटाचा मुकाबला केला. समाजातील विकृतींचा सामना करतानाही तशीच एकजूट दाखवण्याची गरज आहे. त्यामुळे बदलापूरमधील प्रकाराचा निषेध करण्यासाठी आणि माता भगिनींच्या सुरक्षिततेबाबत जागरूक असल्याची जाणीव करून देण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन आपण माता, भगिनी आणि बांधवांना करत आहोत, असेही ठाकरे म्हणाले.

निर्भया प्रकरणानंतर सगळं देश खडबडून जागा झाला. काही दिवसांपूर्वी प बंगालमध्ये असाच प्रकार घडला. त्याचा निषेधही देशभरात करण्यात आला. बदलापूर येथे घडलेल्या प्रकारही तशाच पद्धतीचा असून पुन्हा असे कृत्य करण्यास कोणाचीही हिंमत होऊ नये, यासाठी बंद आयोजित करण्यात आला आहे. यापूर्वी झालेल्या आंदोलन किंवा २४ तारखेला होणारा बंद यात कोणताही राजकीय उद्देश नाही. जेव्हा सहनशीलतेचा अंत होतो त्यावेळी उद्रेक होतो, असेही ठाकरे म्हणाले.

चिमुकल्या विद्यार्थिनीवर अत्याचार होतो तरीही पोलीस दहा दहा तास त्यावर कोणतीही कारवाई करत नसतील, तर सामान्य जनतेने काय करावे, असा सवाल करून ठाकरे म्हणाले की, परवापासून जे काही घडत आहे त्यात कोणतेही राजकारण नाही. तो जनतेच्या मनात उत्पन्न झालेला संताप आहे. त्याला वाचा फोडण्यासाठीच २४ तारखेचा बंद पुकारण्यात आला आहे.

बदलापूर हे मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात येते. बदलापूर मध्ये जनतेच्या संतापाचा आगडोंब उसळला तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रत्नागिरीला बहिणींकडून राख्या बांधून घेत होते. हा निर्लज्जपणाचा कळस झाला. विकृत मानसिकतेतून घडलेल्या या प्रकाराचा निषेध करणे हे मुख्यमंत्र्यांना राजकारण वाटत असेल तर ते देखील विकृत आहेत. विकृतांचे पाठीराखे आहेत. ते घटनाबाह्य मुख्यमंत्री आहेत, अशी टीकाही ठाकरे यांनी केली.

# अगरवाल पती-पत्नीला दिलासा नाहीच; कोर्टाने जामीन फेटाळला

**पुणे :** पुण्यातील कल्याणीनगर येथे पोर्शे अपघाताचे प्रकरण चांगलेच चर्चेत आले होते. त्यानंतर घडलेल्या घडामोडी देखील सर्वांनी पहिल्या आहेत. आपल्या मुलाला वाचवण्यासाठी आरोपी असलेल्या मुलाची वैद्यकीय चाचणी होण्याआधी रक्ताचे नमुने बदलण्यात आल्याचा आरोप आरोपीच्या आई-वडील आणि ससून हॉस्पिटलच्या काही डॉक्टरांवर होता. त्याप्रकरणी ते सध्या तुरुंगात आहेत. दरम्यान या सर्व आरोपींची जामिनासाठी कोर्टात याचिका केली होती. दरम्यान कोर्टाने या सर्व आरोपींची जामीन याचिका फेटाळून लावली आहे.

पुण्याच्या कल्याणीनगर येथे पोर्शे अपघातामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला होता. व्यवसायिक विशाल अगरवाल यांच्या मुलाने भरधाव वेगाने गाडी चालवत दोन जणांचा जीव घेतला होता. त्यानंतर घडलेला घटनाक्रम आपण पाहिला आहेच. दरम्यान आपल्या मुलाला वाचवण्यासाठी वैद्यकीय चाचणीआधी रक्ताचे नमुने बदलण्याच्या आरोपाखाली आरोपीची आई शिवानी अगरवाल, वडील विशाल अगरवाल आणि ससून हॉस्पिटलचे डॉ. अजय तावरे यांच्यासह काही जण तुरुंगात आहेत. या सर्व आरोपींची पुणे कोर्टात जामिनासाठी याचिका केली होती.

पुणे कोर्टात जामिनासाठी शिवानी अगरवाल, विशाल अगरवाल, डॉ. विजय तावरे यांच्यासह अन्य आरोपींची अर्ज केला होता.

# एमआयएमला सहभागी करून घेण्यासाठी महाविकास आघाडीत हालचाली

**मुंबई:** आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादुल मुसलमीन या पक्षाला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू असून सन्मानजनक जागा मिळाल्या तर महाविकास आघाडीत सहभागी होण्याची तयारी एमआयएम ने दाखवली आहे.

एमआयएमचा मुस्लिम मतदारांवर मोठा प्रभाव आहे. मुंबईसह राज्यभरात मुस्लिम मतदान निर्णायक ठरणारे अनेक मतदारसंघ आहेत. त्यामुळे एमआयएम महाविकास आघाडी झाल्यास त्याचा आघाडीला फायदा होऊ शकतो. त्याचप्रमाणे एमआयएम महाविकास आघाडीत सहभागी झाल्यास त्यांना सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळू शकते. त्याचप्रमाणे पक्षाच्या कक्षा रुंदावून प्रतिमा अधिक व्यापक करण्यासाठी एमआयएमला आघाडीचा उपयोग होऊ शकतो.

लोकसभा निवडणुकीला सामोरे जाताना एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडीने एकत्र येण्याच्या दृष्टीने चाचपणी केली. मात्र हे समीकरण आकाराला आले नाही. एमआयएमचे छत्रपती संभाजी नगर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार इम्तियाज जलील यांना पराभवाला सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीत ३१ जागा मिळवलेल्या महाविकास आघाडी एमआयएम सहभागी झाला तर राज्यातील राजकारणाला वेगळे वळण लागू शकते.



# लाडक्या लेकी असुरक्षित

**महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला मान खाली घालायला लावणाऱ्या घटना सध्या वाढल्या आहेत. उत्तरत प्रदेश, बिहार, पश्चिम बंगालमधील राज्यांत महाराष्ट्राची तुलना व्हावी, यासारखी शरमेची दुसरी गोष्ट नाही. राजकारणात चाणक्य असलेले गृहमंत्री देशाला आणि राज्यालाही लाभलेले असताना आणि कडक कायदे केले असतानाही गुन्हेगारीचा आलेख काही कमी होताना दिसत नाही. त्याचे कारण गृहमंत्रालयाची जबाबदारी असणारे नेते जेवढा वेळ गृहखात्याच्या माहितीचा उपयोग राजकारणासाठी आणि पक्षवाढीसाठी करतात, तेवढा तो गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी करीत नाहीत.**

पश्चिम बंगाल असो, की महाराष्ट्र; महिलांच्या बाबतीत क्रूर घटना घडूनही पोलिस गुन्हा दाखल करायला तास न् तास लावतात, याचा अर्थ पोलिसांवर गृहमंत्र्यांचा वचक राहिलेला नाही. लाडक्या बहिणीला पैसे देऊन आपलेसे करताना लाडक्या बहिणी, त्यांच्या आया आणि त्यांच्या लहानग्या चिमुरड्या सुरक्षित आहेत, की नाही, हा गंभीर प्रश्न यानिमित्ताने पुढे आला आहे. निर्भया प्रकरणानंतर करण्यात आलेले कायदे आणि त्यानंतर हैदराबादच्या घटनेनंतर केलेला शक्ती कायदा पाहिला, तर कायदे केवळ कडक करून चालत नाहीत, तर गुन्हे सिद्धतेचे प्रमाण किती आहे, गुन्हा सिद्ध झाला, तरी कालबद्ध पद्धतीने शिक्षेची अंमलबजावणी होते का, या प्रश्नांच्या उत्तरात कायद्याचा वचक अवलंबून असतो. अजमेरमध्ये ३२ वर्षांपूर्वी शंभराहून अधिक मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना आता आजन्मठेपेची शिक्षा होत असेल, तर कायद्याची ती क्रूर चेष्टा आहे आणि एकूण न्यायव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर शंका घ्यायला वाव आहे. अलिकडच्या काळात पालकांचे आपल्या मुलांकडे लक्ष नाही. ते काय करतात, काय पाहतात, त्यांना कुणाची संगत आहे, याकडे पालकांचे जसे दुर्लक्ष आहे, तसेच चौकोनी कुटुंबात मुलांना नीट समजून सांगण्यासारखे कुणीच नाही. नवनव्या गॅझेटचा वापर करून मुले काहीही पाहतात आणि त्यासारखे वागतात. तेलंगणात अलिकडे घडलेली घटना किंवा अल्पवयीन मुलांचे कळ्या कुस्करण्याचे वाढलेले प्रमाण पाहता आपल्याला एकूणच केवळ कायदा करून उपयोग नाही, तर पालक आणि मुलांवरही संस्कार नव्याने करण्याची गरज निर्माण झाली आहे. महिलांना नवदुर्गा, देवी म्हटले, की त्यांच्याबाबतीत कसेही वागण्याचा जणू परवाना मिळाला आहे, असा काहींचा गैरसमज झाला आहे. कोणत्याही मुलीवर अत्याचार झाला, तर समाजमन तेवढेच खवळून उठले पाहिजे. पश्चिम बंगालमधील शिकावू डॉक्टर तरुणीवर झालेल्या बलात्कार आणि खुनानंतर भाजप जेवढ्या त्वेषाने मोर्चा काढतो, तेवढ्या त्वेषाने बदलापूरमधील घटनेनंतर काढीत नाही. उलट, तेथील घटनेनंतर झालेल्या आंदोलनाच्या वेळी आंदोलक बाहेरचे होते, असा आरोप तिथले आमदार करीत असतील, तर त्याला राजकारण नाही म्हणायचे, तर काय, या प्रश्नाचे उत्तर मिळायला हवे.

दोन चिमुकल्यांवर नराधमाने केलेल्या अत्याचारानंतर अख्खे बदलापूर एकवटले. संपूर्ण राज्यभरातून संताप व्यक्त झाला. देशाने दखल घेतली. सरकार ‘क्शन मोड’वर आले. शाळांसाठी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी काही नियम असतात आणि त्याची अंमलबजावणी होते, की नाही, याची आठवण शिक्षणमंत्र्यांना अशी घटना घडल्यानंतर येते का, एरव्ही शिक्षण खाते काय करते, या प्रश्नाचे उत्तर शिक्षण आणि गृहमंत्रालयाने द्यायला हवे. महिला अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर काय करावे, याच्या मार्गदर्शक सूचना केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेल्या असताना त्याचे पालन होते, की नाही, हे कोण पाहणार? कोलकात्ता आणि बदलापूर या दोन्ही घटनांत पोलिसांच्या दिरंगाईवर प्रश्न उभे राहिले. दोन्ही ठिकाणी राजकीय दबावापोटी पोलिसांवर प्रकरण दडपण्याचा आरोप झाला. बंगालमध्ये संतप्त जमावाने घटना घडलेल्या रुग्णालयात तोडफोड केली. इकडे बदलापुरातही लोकांनी शाळेत शिरून शाळेची तोडफोड केली. मुंबई-पुणे लोहमार्गावरची वाहतूक दहा तास आंदोलकांमुळे ठप्प होत असेल, तर आंदोलकांचा संताप किती तीव्र होता, हे त्यावरून लक्षात यायला हरकत नाही. पश्चिम बंगालच्या घटनेवरून सत्ताधारी भाजप विरोधकांना घेरत होते. आता बदलापूरच्या घटनेतील शाळाच भाजप नेत्याची असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. पश्चिम बंगालच्या घटनेनंतर तिथल्या कायदा व सुव्यवस्थेचा आधार घेऊन राज्यपाल राष्ट्रपती राजवटीची शिफारस करीत असतील, तर मग राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालाच्या आधारे उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्य प्रदेश या राज्यांतही राष्ट्रपती राजवट लागू करावी लागेल. गंभीर घटनांचे राजकारणी राजकारण करीत असल्याने मूळ प्रश्न बाजूला पडतात आणि गुन्हेगारांचे फावते, हे राजकारण्यांच्या लक्षात येत नाही असे कसे म्हणता येईल; परंतु राजकारणापलीकडे कसलाच विचार न करण्याची झापडबंद वृत्ती अलीकडे फोफावली आहे. बदलापुरातले लोक इतके आक्रमक का झाले, पोलिसांनी कुणाच्या आदेशावरून तक्रार नोंदवण्यास दिरंगाई केली, याचा छडा अद्याप लागलेला नाही. लोकांच्या उद्रेकानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक शुभदा शितोळे, एक जमादार, एक पोलिस निरीक्षकाला निलंबित करण्यात आले आहेत. मुख्याध्यापकासह मुलांची जबाबदारी असणाऱ्या दोन सेविकांनाही निलंबित करण्यात आले. कोलकाता आणि बदलापूर या दोन्ही घटनांनी देश ढवळून निघाला. त्यामुळे नियमित पद्धतीऐवजी अशा घटनांत दोषींना तातडीने शिक्षा देवून धाक बसवण्याची गरज आहे. अर्थात सध्या व्यक्त होत असलेल्या नेत्यांच्या आणि समूहाच्या प्रतिक्रिया या कायदा आणि न्यायाशी सुसंगत नाहीत. पोलिसांनी योग्य तपास करून, न्यायालयाने दिलेल्या शिक्षेची वेळेत अंमलबजावणी होणे न्यायसुंसगत आहे. एन्काऊंटर करणे, घटनेच्या ठिकाणी आणून फाशी देण्यासारख्या मागण्या लोकशाही व्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या आहेत आणि कायद्याच्या राज्याचे अराजकात रुपांतर करण्यासारखे आहे.

मागच्या महिन्यांतच सरकारने पावसाळी अधिवेनशनात मांडलेल्या आर्थिक पाहणी अहवालात महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा अधोरेखित झाला होता. हा अहवाल प्रसिद्ध होत नाही, तोवर उरण प्रकरण, नवी मुंबई प्रकरण, छत्रपती संभाजीनगरचे प्रकरण आणि आता हे बदलापूर प्रकरण समोर आले आहे. ग्रामीण भागात तर अशा कित्येक घटना सहज दाबून टाकता येतात. या मूक प्रकरणांना वाचा फुटली तर समाजातील एक जळजळीत वास्तव समोर येईल. कोलकाता बलात्कार प्रकरण असो वा आता बदलापूरचे प्रकरण; दोन्ही प्रकरणात अनेक साम्य आहेत. पहिले म्हणजे गुन्हा दाखल करण्यास लागलेला वेळ. फिर्याद नोंदवण्याच्या प्रक्रियेनुसार पोलिसांकडून चौकशी केल्यानंतर गुन्हा दाखल केला जातो; पण कोलकाता प्रकरणात शवविच्छेदनाचा अहवाल आलेला असतानाही गुन्हा दाखल करण्यास तीन तास उशीर झाला. आरोपीला अटक करण्यासही टाळाटाळ केली जात होती. बदलापूर प्रकरणात तर गुन्हा नोंदवण्यासच १२ तासांहून अधिक काळ घेतला. त्यामुळे याला पोलिसांवर असलेला दबाव कारणीभूत आहे का पोलिसांची कार्यपद्धती जबाबदार, याचा शोध घेणे गरजेचे आहे. कोलकाता आणि बदलापूरमध्ये हजारोंच्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले. महिला, तरुणींनी मोर्चे काढले. आंदोलन केले; पण कोलकात्याचे आंदोलन चिरडण्यात आले आणि आता बदलापूर प्रकरणातही वार्तांकन करणाऱ्या महिलांनाच नेत्यांनी उलट जाब विचारला. ‘तुझ्यावरच बलात्कार झाल्यासारख्या बातम्या का देतेस? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकीकडे लाडक्या बहिणीच्या सुरक्षेची जबाबदारी घेत असताना त्यांच्या गटाच्या नेत्याने इतके बेजबाबदार विधान करून घटनेचे गांभीर्य घालवून टाकले. इतकी असंवेदनशील माणसे आपल्या भवतालात आहेत, म्हणून अशा घटना वारंवार घडतात. याला कायदा सुव्यवस्था जितकी कारणीभूत आहे, तितकीच मानसिकताही कारणीभूत आहे. पण ते मान्य केले जात नाही. बलात्कारित महिलेला, मुलीलाच दोष देण्याची आणि योनीशूचितेला महत्त्व देण्याची वृत्ती कमी होत नाही, तोपर्यंत मुलींनाही आपणच दोषी असल्यासारखे वाटत राहणार. उलट, ज्याने गुन्हा केला, त्याला तोंड लपवण्याची वेळ यायला हवी; परंतु जिच्या शरीरावर आणि मनावर आघात झाला, तिलाच तोंड लपवण्याची वेळ येत असेल, तर सामाजिक मानसिकतेचाही विचार करावा लागेल. प्रेमाचा अर्थ बळजबरी नव्हे, हिसकावणे तर नव्हेच नव्हे. प्रेमात त्यागाचाही संबंध असतो. तरुणांनी कृष्णासारखे प्रेम करावे. राधेबरोबर लग्न नशिबात नसल्याचे कृष्णाने ते मोठ्या मनाने स्वीकारले. प्रेयसीला कसा आदर द्यावा, हे त्याच्यकडून शिकावे. अनेक प्रियकर प्रेमाच्या नावाने प्रेयसीला फसवतात. तिच्यावर अत्याचार व बलात्कार करतात. कधी कधी तर तिची हत्याही करतात. आजच्या तरुणांना नकारसुद्धा पचवता येत नाही. राधेने लग्न करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा श्रीकृष्णाने तिच्या निर्णयाचा आदर केला. तसे करता आले पाहिजे. प्रेयसीच्या सुखात सुख मानण्यात खरे प्रेम असते. घरात अशी शिकवण देणारे आजी-आजोबांची कमतरता अशा प्रसंगी आवर्जून लक्षात येते.

# बदलापूरची घटना ताजी असताना कोल्हापुरात धक्कादायक घटना

कोल्हापूर : बदलापूरमध्ये चार वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना ताजी असतानाच कोल्हापुरात धक्कादायक घटना समोर आली आहे. दहा वर्षांच्या मुलीची हत्या झाल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. कोल्हापूरच्या शिये गावातील राम नगर परिसरात ही घटना उघडकीस आली आहे. हत्या झालेली मुलगी बुधवारी, २१ ऑगस्टच्या दुपारपासून बेपत्ता होती. त्यानंतर मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार करण्यात आली होती.

आज गुरुवारी २२ ऑगस्ट रोजी मुलीची हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या केल्याचा संशय स्थानिकांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

१० वर्षीय मुलीच्या हत्येप्रकरणी बोलताना पोलीस अधिक्षक महेंद्र पंडित यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरोली एमआयडीसी हद्दीमध्ये रामनगर इथे तीन वर्षांपूर्वी बिहारमधून स्थलांतरित झालेलं कुटुंब राहतं. गुड्डू सिंह अग्रहरी असं या कुटुंबातील प्रमुखाचं नाव आहे. गुड्डू सिंह आणि त्यांची पत्नी दोघंही एमआयडीसी कंपनीत मजूर म्हणून काम करतात. बुधवारी सकाळी ८ वाजता दोघंही कामाला गेले. त्यांच्या घरात मुलांचा मामाही सोबत राहतो. त्यांना तीन मुली आणि दोन मुलं अशी एकूण पाच मुलं आहेत.

या मुलीचे आई - वडील शिरोली औद्योगिक वसाहतीमधील एका खासगी कंपनीत कामाला जातात. बुधवारी सायंकाळी ते कामावरुन घरी आल्यानंतर त्यांना मुलगी कुठेही दिसली नाही. त्यांनी तात्काळ आजूबाजूला तसंच नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला. तरीही ती कुठेही दिसली नाही. मुलीच्या मामाला विचारणा केली असता त्याने सांगितलं, की मुलीने दुपारी जेवण केलं आणि ती मोबाईल घेऊन बसली होती. त्यानंतर मला कामावर जायचं असल्याने मी झोपलो. मात्र त्यानंतर ती मोबाईल ठेवून कधी घरातून निघाली हे माहित नसल्याचं त्याने सांगितलं. मुलगी बुधवारी दुपारपासून घरातून गायब झाली होती.

शिये रामनगर येथील १० वर्षीय परप्रांतीय मुलगी गायब झाल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी बुधवारी रात्री शिरोली पोलिसांत तक्रार दिली होती. त्यानंतर पोलिसांनी स्थानिक रहिवाशांसोबत शिये रामनगर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे आणि परिसातील शेतातील विहिरी, ओढे, ऊसाच्या शेतात देखील तपास केला होता. पण कोणताच सुगावा पोलिसांच्या हाती लागला नव्हता. सकाळी चार वाजेपर्यंत पोलीस तपास घेत होते.

# मोहोळ विधानसभा लढण्याचे शरद बनसोडेंकडून संकेत

**सोलापूर :** आगामी विधानसभा निवडणुकीत मोहोळ विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छुक असल्याचे स्पष्ट संकेत माजी खासदार शरद बनसोडे यांनी आज दिले आहेत. सोलापूरात पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, महायुतीमध्ये ही जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे.

युती झाली आणि कदाचितही जागा भारतीय जनता पार्टीला सुटली तर भाजपाकडून आपण येथून निवडणूक लढवू. भाजपने आपल्याला संधी न दिल्यास आपण शरद पवार गटाकडून निवडणूक लढताल का? या प्रश्नावर शरद बनसोडे म्हणाले, जर..तर..चा प्रश्न आहे. मी यंदा निवडणूक लढणारच. राजकीय भूमिका घेत इतके दिवस पक्षासाठी खपलो आहोत. आणखी किती दिवस बाहेर राजकीय संधीची वाट पाहत थांबायचं. प्रसंग पडला आणि शरद पवार गटाने संधी दिली तर तिथूनही निवडणूक लढू. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकी मध्ये या मतदारसंघात विरोधात काँग्रेसला ६५ हजार इतकं मताधिक्य मिळालं. आपण २०१४ मध्ये लोकसभेला उमेदवार होतो. त्यावेळी भारतीय जनता पार्टीला १५ हजाराचं मताधिक्य मिळालं होतं. यानंतर या मतदारसंघात आपण गावोगावी संपर्क ठेवला, काम केली. आजही या भागामध्ये आपल्याला मानणारा मोठा वर्ग आहे. नुकत्याच झालेल्या मोठ्या पराभवानंतर पक्षाने इथे पराभव का झाला? याची कारण शोधण्यासाठी प्रत्येक मतदारसंघात गावोगावी जाण्यास सांगितल आहे. आपण हे काम सुरू केलं असून मोहोळ, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर मधील अनेक गावांमध्ये जाऊन आलो आहोत. येथे केवळ जरांगे पाटील हा फॅक्टर आमच्या विरोधात मतदान जाण्यास कारणीभूत आहे असं नव्हे.

भारतीय जनता पार्टीने या मतदारसंघात ज्यांच्यावर प्रचाराची जबाबदारी दिली होती. त्यांनी स्थानिक भाजपच्या युतीच्या कार्यकर्त्यांना एकत्रित आणून समन्वयान काम केलं नाही. याबाबतही अनेक ठिकाणी तक्रारी पुढे आल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीत आपल्याला प्रचारात सक्रिय करून घेण्यात आलं नव्हतं. याविषयी आपण पक्षाला पत्र देऊन विचारणा केली आहे असेही शरद बनसोडे यांनी सांगितलं. आता पक्षाने जबाबदारी दिली म्हणून या भागात फिरत आहे. लोकसभा निवडणुकीत युती विरोधात ६५००० मतदान असलं तरी विधानसभेत ही स्थिती बदलू शकते ही शरद बनसोडे यांनी व्यक्त केला. ते म्हणाले,येथील माजी आमदार राजन पाटील यांनी आपल्याला मागच्या लोकसभा निवडणुकीत शरद बनसोडे यांनाच उमेदवारी मिळायला हवी होती असं स्पष्ट मत व्यक्त केलं होतं. त्याआधी त्यांनी सहकार्याची भूमिका ही ठेवली होती. सध्या मोहोळ मध्ये अनेक प्रकारचे नवे मुद्दे आहेत. विद्यमान आमदारांविरोधात नाराजी ही दिसून आली आहे. मोहोळ विधानसभा मतदारसंघातून आपण निवडणूक लढवावी असं कार्यकर्त्यांचेही म्हणणं आहे. आपण यावर विचार करत आहोत.

भारतीय जनता पार्टी सह सर्वच पक्ष वेगवेगळे लढले तर आपण भाजपचे उमेदवार म्हणून निवडणूक मैदानात उतरण्यास सज्ज आहोत. जनतेची सेवा करायची आहे.

अन्य पक्षांनाही संधी दिली विशेषतः शरद पवार गटाने आपला विचार केला तर आपण तेथूनही निवडणुक लढऊ. आपण शरद पवारांना भेटणार आहात का? या विषयावर ते म्हणाले, जर आणि तर चा प्रश्न आहे. सध्या भाजप नेतृत्व विशेषता: देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली जबाबदारी आपण पार पाडत आहोत. मोहोळ मध्ये जनसंपर्क करीत आहोत. राजकारणात कधीही काहीही होऊ शकतं असेही अखेरीस त्यांनी स्पष्ट करत कोणतीही भूमिका घेण्यास सज्ज असल्याचे स्पष्ट संकेत दिले.

# राज्य सरकारी कर्मचारी संघटनेची द्वार सभा

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि बृहन्मुंबई राज्य सरकारी संघटनेने दिलेल्या संपाच्या हाकेनुसार २९ ऑगस्टच्या बेमुदत संपाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी मिनिस्ट्रियल स्टाफ असोसिएशन आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई आरोग्य भवन येथे द्वार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागाचे अध्यक्ष संजय मंडले, कोषाध्यक्ष विजय पोस्टूरे तसेच बृहन्मुंबई जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या महिला संघटक कविता ठोंबरे, जी एस टी संघटनेचे संतोष सरवदे उपस्थित होते. यावेळी संजय मंडले यांनी बेमुदत संपाची पार्श्वभूमी सांगत एन पी एस छझड धारकांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची चळवळ जाणून घेणे आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या नेतृत्त्वाच्या आदेशाचे पालन करुन संपात १००% सहभाग



नोंदवावा असे आवाहन केले.

या संपामुळे जे लाभ मिळणार आहेत ते मिळवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न संपाच्या माध्यमातून करुया तसेच उर्वरित लाभासाठी पुन्हा संघर्षाची तयारी ठेवावी लागली तर पुन्हा तीव्र आंदोलन करण्याची तयारी ठेवा असे मत व्यक्त केले. तर कविता ठोंबरे यांनी विस्तृतपणे संपामध्ये मिळवलेल्या सर्व बाबींची मांडणी केली. महिला वर्गांनी सुद्धा नेहमीप्रमाणे याही संपामध्ये १०० टक्केसहभाग नोंदवावा अशी अपेक्षा व्यक्त करुन संघशक्तीचे दर्शन घडवावे असे आवाहन केले. द्वारसभेच्या दरम्यान, स्थानिक संघटनेचे अध्यक्ष विलास तरटे, उपाध्यक्ष जितेंद्र नागवेकर व सचिव बाबासाहेब साळवे इतर पदाधिकारी आणि आरोग्य भवन विभागातील बहुसंख्य कर्मचारी उपस्थित होते.

# बदलापूरमधील शिंदे गटाचा नेता वामन म्हात्रेवर अखेर गुन्हा दाखल

**बदलापूर :** बदलापूर घटनेचे वार्तांकन करणाऱ्या सकाळच्या वार्ताहर मोहिनी जाधव यांना अर्वाच्च भाषा वापरणारा बदलापूरचा माजी नगराध्यक्ष आणि शिवसेना शिंदे गटाचा नेता वामन म्हात्रे याच्यावर अखेर बदलापूर पोलीस ठाण्यात अट्रॉसिटी अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. वामन म्हात्रे याला तातडीने अटक करण्यात यावी अशी मागणी पत्रकार संघटनांनी केली आहे.

बदलापुरात साडेतीन वर्षीय दोन मुलींवर झालेल्या बलात्काराच्या निषेधार्थ मंगळवारी बदलापूरकरांनी रेल्वे रुळावर उतरून आरोपीला फाशी द्यावी या मागणीसाठी तब्बल १० तास आंदोलन केले. एकीकडे संपूर्ण जनता चिमुरडींना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरली होती तर, शिंदे गटाचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी महिला पत्रकाराशी बोलताना अर्वाच्च भाषा वापरन अपमानित केले. तू अशा बातम्या देत आहेस, जणू तुझ्यावरच बलात्कार झाला आहे. असं वक्तव्य केलं होत. म्हात्रेंच्या या वक्तव्याचा पत्रकार संघटनांकडून तीव्र निषेध करण्यात आला. वामन म्हात्रेवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी पत्रकार संघटनाकडून करण्यात आली. अखेर वामन म्हात्रेंवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिला अत्याचार प्रकरणी राज्यकर्त्यांनी राजीनामे द्यावेत : सत्यजितसिंह पाटणकर

## २४ ऑगस्टच्या महाराष्ट्र बंदमध्ये सामील होण्याचे आवाहन

**पाटण :** राज्यात महिलांवरच नव्हे तर अल्पवयीन बालिकांवर सातत्याने अन्याय, अत्याचार करत क्रूरपणाचा कळस नराधमांकडून सातत्याने होत असताना राज्यकर्ते मूग गिळून गप्प बसले आहेत. लाडक्या बहिणींना आपल्याच घामाच्या करातून पैसा देत त्याचे श्रेय घेऊ पाहणाऱ्या हेच सत्ताधारी दुसरीकडे महिलांच्या सुरक्षिततेवर हाताची घडी तोंडावर बोट हा दुटप्पीपणा करत असतील तर हे आम्ही कदापिही खपवून घेणार नाही. बदलापूर अथवा अन्य कोणत्याही घटनात महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे व झोपलेल्या राज्यकर्त्यांना जागेवर आणण्यासाठी आता महिला भगिनींनीही पुढे आलं पाहिजे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांनी केले.

पाटण येथील लायब्ररी चौक येथे बदलापूर घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या वतीने आयोजित निषेध सभेवेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना सत्यजितसिंह पाटणकर पुढे म्हणाले आपल्या देशात सध्या बहुतांश राज्यात महिला असुरक्षित आहेत. यापूर्वी अन्य राज्यात तर गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढतच आहेत. एका बाजूला राज्यभर असे अन्याय होत असतानाच मध्यंतरी अगदी आपल्या तालुक्यातील तारळे



**बदलापूर घटनेच्या निषेधार्थ पाटण येथे आयोजित निषेध सभेच्या वेळी सत्यजितसिंह पाटणकर सोबत महाविकास आघाडीचे दाधिकारी.**

विभागात महिलेवर अन्याय झाला मात्र त्यावेळी प्रशासनाला हाताशी धरून कार्यकर्त्यांच्या राजकीय सोयीखातर त्या महिलेला न्याय दिला गेला नाही. अशा अपप्रवृत्तींचा केवळ निषेध करून चालणार नाही तर त्यांचे तातडीने राजीनामे घेतले पाहिजेत. केवळ श्रेयवाद, घोषणा, आश्वासने देणारी ही मंडळी आपल्या आया बहिणींच्या सुरक्षितेसाठी कोणत्याही उपाययोजना व ठोस कडक कारवाया करत नाहीत यावरूनच यांची विकृत मानसिकता स्पष्ट होत आहे.

शनिवार २४ ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीच्या वतीने देण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदमध्ये आपण हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा आणि या नराधमांना फाशी व राज्यकर्त्यांच्या या झुंडशाहीचा आपण निषेध करूयांत असे आवाहनही शेवटी सत्यजितसिंह पाटणकर यांनी केले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख सुरेश पाटील, ग्रंथपाल संजय इंगवले, पत्रकार सौ. विद्या म्हासुर्णे कर, नगरसेविका सौ. मिनाज मोकाशी आदी मान्यवरांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला.

यावेळी पाटणच्या नगराध्यक्षा सौ. मंगल कांबळे, उप नगराध्यक्ष सागर

पोतदार, नगरसेवक, नगरसेविका, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ व विद्यार्थी, विद्यार्थिनी,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

## अनवडी पोलीस पाटील राज्यपाल पुरस्काराने सन्मानित



सातारा : महाराष्ट्र शासनाकडून मान, सन्मानचा दिला जाणारा पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कार सी. पी राधाकृष्णन राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील भुईंज पोलीस स्टेशन अंतर्गत येणार्या अनवडी गावातील कर्तव्यदक्ष पोलीस पाटील तथा महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील एकीकरण संघाचे राज्य सचिव दिपक गिरीगोसावी यांना १५ ऑगस्ट रोजी सातारा येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात शंभूराज देसाई मंत्री उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री जिल्हा सातारा यांच्याकडून प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व २५ हजार रुपये रोख देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान यावेळी जिल्हा अधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख, व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सन्मानपूर्वक देण्यात आला.

महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णयानुसार गाव पातळीवर कायदा व व्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करणे, लोकन्यायालयात पंच म्हणून कार्य करून प्रकरणे निकाली काढण्यात मदत करणे,पोलीस तपासात अत्यंत गंभीर व इतर गुन्ह्यातील आरोपीची गुप्त माहिती व ठावठिकाणा काढून त्यांना पकडून देण्यासाठी व गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मदत करणे, गावतील सण, उत्सव, यात्रा निवडणूका या सर्वच घडामोडीवर लक्ष ठेवून त्या शांततेत पार पाडणे तसेच महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचे निमंत्रक म्हणून काम पाहणे. अशा कामात केलेल्या तसेच अतुलनीय साहस

# साताऱ्यात गणेशोत्सवाची लगभग

## कुंभारवाड्यातील रंगकाम अंतिम टप्प्य

**सातारा :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या श्री गणरायाच्या आगमनाला दोन आठवडे शिल्लक आहेत. साताऱ्याच्या कुंभारवाड्यामध्ये श्रीमूर्तीवरून अंतिम हात फिरवला जात असून, साताऱ्यात मंडप उभारणी गणेश मंडळांची तयारीची लगबग सुरू आहे. दुसरीकडे मोठ्या गणेश मंडळांनी अधिक- अधिक उंच गणपतीची पारंपरिक प्रथा कायम ठेवली आहे.

गणेश भक्तांमध्ये मोठा उत्साह

शाडू मातीची टंचाई यामुळे या मातीच्या मूर्ती व पी.ओ. पी.च्या गणेश मूर्ती वीस टक्क्यांनी महागल्याचे गणेश मूर्ती विक्रेत्यांनी सांगितले. सातारा शहरासह जिल्ह्यामध्ये गणेशोत्सव अत्यंत आनंदाने साजरा होत आहे. ७ सप्टेंबर रोजी गणरायांचे आगमन होत आहे. सातारा शहरांमध्ये २०० पेक्षा अधिक छोटी मोठी मंडळ आहेत. या मंडळांनी गणेशोत्सवाची तयारी सुरू केली आहे. गणेश भक्तांमध्ये मोठा उत्साह आहे. यामुळे मोठ्या उंचीच्या मूर्ती व सामाजिक विषयांवरील आरास अधिक चांगल्या पद्धतीने करण्यावर भर दिला जात आहे. यंदा काही मंडळाकडून पुन्हा जिवंत देखावे सादर केले जातील, अशी अपेक्षा आहे.

बहुतांश गणेश मंडळांनी गणपतीची वर्गणी जमा करून कोणते कार्यक्रम घ्यायचे तसेच आरास करण्याचे बजेट काढून घेऊन तयारी सुरू केली आहे.

नगरपालिका, पोलीस विभाग यांनी एक खिडकी योजना सुरू करून मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना विविध प्रकारच्या लागणाऱ्या परवानगी देण्याचे काम सुरू झाले आहे. शहरातील वेगवेगळे खड्डे बुजवण्याची प्रक्रिया पालिकेने सुरू केली असून, रस्त्याच्या डांबरीकरणासाठी पुन्हा २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. डेकोरेशनचे साहित्य बाजारपेठेत विक्रीसाठी आले आहे. थर्मोकोल पासून बनवलेल्या साहित्यांना बंदी आहे त्यामुळे इतर पर्याय वापरून डेकोरेशनचे साहित्य फुलांच्या माळा रोषणाई सजावटीचे साहित्य बाजारपेठेत उपलब्ध आहे.

### श्रीमूर्ती २० ते २२ टक्क्याने महाग

**यंदा कारागिरांची टंचाई तसेच कच्च्या मालाच्या महागलेल्या किमती, रंगांचे महागलेले दर यामुळे शाडू आणि पीओपी या दोन्ही प्रकारच्या श्रीमूर्ती २० ते २२ टक्क्याने महागल्याचे मूर्तिकारांनी सांगितले आहे. गणेश मूर्तींचे माहेरघर असणाऱ्या पेन येथे सुद्धा गणेश मूर्तींना महागाईचा फटका बसल्याचे चित्र आहे. तिथून मूर्ती साताऱ्यात आणावयाच्या वाहतुकीचा दरही वाढल्याने यंदा गणेश भक्तांच्या खिशाला चांगली चाट बसणार आहे.**



### पूजनासाठी दुकाने बाजारपेठेत सजू लागली

**गणपतीची पूजा, गुलाल, लहान पाट, लाल रंगाचे आसन पूजनासाठी लागणाऱ्या वस्तूंची दुकाने बाजारपेठेत सजू लागली आहेत. यंदा राज्य शासनाने पी.ओ.पी. मूर्तींवर बंधन घालण्याचे धोरण घेतले होते मात्र शाडू मातीची अनुपलब्धता तसेच मूर्ती बनवण्यावरच्या मर्यादा कारागिरांची टंचाई यामुळे यावर्षी सुद्धा पीओपीच्या मुर्त्यांनाच थोडासा प्राधान्यक्रम राहावा, असा आग्रह धरला जात होता त्यानुसार शाडू मातीचे धोरण तात्पुरते बाजूला ठेवून पी.ओ.पी.च्या मुर्त्यांसाठी लवचिक धोरण स्वीकारण्यात आल्याने मूर्तिकारांना मोठा दिलासा मिळाला.**

## त्या नराधमांना आमच्या ताब्यात द्या रिपाईकडून निदर्शने

**सातारा :** कोलकत्ता येथे झालेल्या एका प्रशिक्षणारथीं डॉक्टर युवती वरती जो अन्याय अत्याचार झाला तो नराधम संजय राय यास फासावर लटकावावे आणि हे प्रकरण ताजे असतानाच मुंबई बदलापूर येथील साडेतीन वर्षाच्या चिमूरड्या दोन मुलींवरती ज्या निच नराधमाने अमानुषरित्या त्यांचे लैंगिक छळ करून त्यांच्यावरती अतिप्रसंग केला ही घटना बदलापूर येथील एका नामांकित शाळेमध्ये घडलेली आहे या घटनेचा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यलयासमोर निषेध व्यक्त करण्यात आला.

दहिवडी जि सातारा येथील शिखरशिगंनापुर डाँगरामध्ये आपल्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमास देखील फासावर लटकवावे.अशी मागणी देखील रिपाई ए च्या वतीने करण्यात आली. जिल्हाध्यक्ष दादा ओव्हाळ, सलीम शेख, सोमनाथ धोत्रे, मदन खंकाळ, सिद्धार्थ तुपे, सनी गालफडे आदी उपस्थित होते.

## औंध उपसा योजनेबाबत आमदार गोरे यांनी दिशाभूल करणे थांबवावे

### खटाव तालुका पाणी संघर्ष समितीची मागणी

**वडूज :** खटाव तालुक्यातील औंधसह परिसरातील २१ गावे पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्यासाठी आसुसलेली असताना खटाव माणचे लोकप्रतिनिधी जयकुमार गोरे यांनी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केवळ औंधसह २१ गावातील दुष्काळग्रस्त लोकांची सुरू केलेली दिशाभूल थांबवावी अशी टीका खटाव तालुका पाणी संघर्ष समितीने केली आहे.

औंध उपसा सिंचन योजनेच्या मूळ १६ गावामध्ये समाविष्ट होण्यासाठी भोसरे, लोणी, कोकराळे धकटवाडी आणि सिद्धेश्वर कुरोली ही गावे गेली अनेक वर्ष संघर्ष करत आहेत. या गावातील लोकांनी ९ जानेवारीला वडूजच्या तहसील कचेरीवर लक्षवेधी जनआक्रोश एल्गार मोर्चा काढला. त्यानंतर खटाव तालुका पाणी संघर्ष समितीने वडूज तहसीलदार कचेरीसमोर २६ फेब्रुवारी रोजी खटाव तालुक्यातील पाणी प्रश्नांच्याबाबत आणि उरमोडीचे पाणी सोडण्यासाठी तीन दिवसाचे उपोषण केले होते. त्यावेळेला कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी खटाव तालुका पाणी संघर्ष समितीला आंदोलन सोडतेवेळी दिलेल्या पत्रामध्ये औंधच्या योजनेमध्ये पाच गावाचा समावेश झाल्याचे लेखी पत्र दिले होते. त्या पत्रामध्ये भोसरे, लोणी, कोकराळे, धकटवाडी आणि सिद्धेश्वर कुरोली या गावांच्या एकूण भिजणारे क्षेत्राचा उल्लेख केला आहे. मग आता ही ५ गावे नव्याने समाविष्ट झाल्याच्या घोषणा करून तुम्ही आमची दिशाभूल कशाला करताय? यातून तुम्ही काय साध्य करणार आहात? असा सवाल पाणी संघर्ष समितीने उपस्थित केला आहे. औंधसह १६ गावांच्या उपसा सिंचन योजनेतून नव्याने समाविष्ट झालेली ५ गावे वगळावीत म्हणून लोकसभेच्या कालावधीत होऊन पाणी प्रश्नांचे अभ्यासक आणि समाजसेवक दत्ताभाऊ जगदाळे यांनी औंधमध्ये ८ दिवस आमरण उपोषण केले होते, याचा अर्थ स्पष्ट आहे की भोसरे, लोणी, कोकराळे, धकटवाडी आणि सिद्धेश्वर कुरोली ही गावे औंधसह १६ गावांच्या योजनेत यापूर्वीच समाविष्ट झाली होती, मग आत्ता आपण पेपरबाजी करून गावे नव्याने समाविष्ट झाली असल्याच्या घोषणा करण्याच्या वलग्ना कशाला करत आहात? विधानसभा निवडणुकीच्या डोळ्यासमोर जनतेला गृहीत धरून दिशाभूल करणे थांबवावे असा इशाराही खटाव तालुका पाणी संघर्ष समितीचे समन्वयक विजय शिंदे यांनी उपस्थित दिला आहे.

## बदलापूर घटनेचा लोणंद काँग्रेसकडून तीव्र निषेध

### आरोपींवर कठोर कारवाईची तसेच लेकींच्या सुरक्षिततेची मागणी

**लोणंद :** बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ लोणंद येथील काँग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध व्यक्त करून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली तसेच महिलांच्या सुरक्षीततेची मागणी लोणंद पोलीस स्टेशनला निवेदन देऊन करण्यात आली.



आज दि. २१ रोजी लोणंद काँग्रेसच्या वतीने बदलापूर येथे दोन अल्पवयीन मुलींवर शाळेतील एका नराधम कर्मचाऱ्याकडून करण्यात आलेल्या अत्याचाराचा निषेध व्यक्त करून त्याच्यावर लवकरात लवकर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली तसेच सद्यस्थितीत राज्यातील महिलांवर वारंवार होत असलेल्या अत्याचारांच्या पार्श्वभुमीवर महिलांच्या सुरक्षीततेची मागणी लोणंद पोलीस ठाणे येथे निवेदन देवून करण्यात आली.

यावेळेस खंडाळा तालुका काँग्रेस अध्यक्ष सर्फराज बागवान, जेष्ठ नेते शामसुंदर डोईफोडे, एन सी खरात, रमेशअण्णा कर्णवर, अनिल हरिदास, इक्बालभाई बागवान, युवक काँग्रेस प्रदेश महासचिव तारिक बागवान, अमोल ठोंबरे, शकील इनामदार, प्रकाश केसकर, इक्बाल अत्तार,गुजाबासाळुंखे, बालकिशन भाटिया, मोईन बागवान,विशाल जाधव, विशाल भांडलकर तसेच लोणंद शहरातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## कोरेगाव येथे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा तालुकास्तरीय मेळावा संपन्न

**कोरेगांव :** इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या मार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी डी.पी भोसले कॉलेज, कोरेगाव येथे तालुकास्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डी.पी. भोसले कॉलेजचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब चव्हाण होते.

कार्यक्रमासाठी कोरेगावचे पोलीस निरीक्षक घनश्याम बल्लाळ, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय सातारा येथील निरीक्षक सुनील करचे, श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा ब्रह्मपुरीच्या मुख्याध्यापक भारती मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.



उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

आश्रमशाळेतील विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय साताराचे निरीक्षक सुनील करचे यांनी विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजना, शिष्यवृत्ती शिक्षणाच्या संधी यासंबंधी सविस्तर माहिती सांगितली. समाजातील जास्तीत जास्त लोकांनी या सर्व योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डी.पी.भोसले कॉलेजचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना म्हणजे सर्वांसाठी सुवर्णसंधी आहे त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. या विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळांमधील एक आदर्श आश्रमशाळा म्हणजे ब्रह्मपुरी येथील श्री गाडगे महाराज आश्रमशाळा आहे. आश्रमशाळांमुळे बहुजन समाजातील शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळते. त्यामुळे आपण सर्वांनी शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित असणाऱ्या सर्वांसाठी या विभागाच्या योजना पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे असे सांगितले.यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते श्री गाडगे महाराज आश्रमशाळा, ब्रह्मपुरी येथील कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान व सत्कार करण्यात आला.

## साप येथे ओढ्यावरील पुलाच्या पाईपसह भराव गेला वाहून

### कराड उत्तरच्या लोकप्रतिनिधींनी तात्काळ लक्ष देणे गरजेचे



**कोरेगांव :** साप ता. कोरेगाव येथे सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे ओढ्याला आलेल्या पुराच्या पाण्यात गावडे वस्तीला जोडणाऱ्या पुलाच्या सिमेंट पाईपसह फरशी पुलावरील भराव वाहून गेल्यामुळे गावडे वस्तीतील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या प्रकरणी कराड उत्तरचे आमदार बाळासाहेब पाटील यांनी तात्काळ लक्ष घालून नागरिकांचा मूलभूत प्रश्न मार्गी लावावा अशी सर्वसामान्य जनतेतून मागणी होत आहे.

गुरुवार व शुक्रवारी पडलेल्या मुसळधार पावसामुळे साप येथील गावडे वस्तीला जोडणाऱ्या फरशी पुलाच्या दोन पाईप काही अंतरावर वाहून गेले असून ग्रामपंचायतीने तात्पुरता केलेल्या दुरुस्ती केलेला भराव वाहून गेल्यामुळे गावडे वस्तीवरील लोकांना ये जा करणे अवघड झाले आहे. या वस्तीवर सुमारे पंधरा ते वीस कुटुंबाचे वास्तव्य असून तेथून जाण्यास दुसरा पर्यायी रस्ता नाही.

यापूर्वी दोन वेळा साप ग्रामपंचायतीकडून तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्ती करून नागरिकांची समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला होता. मात्र ग्रामपंचायतीच्या प्रयत्न व खर्चाला मर्यादा असल्याने कराड उत्तरचे विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील यांनी तात्काळ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी लक्ष द्यावे अशी ग्रामस्थांमधून मागणी होत आहे.

## रहिमतपूरमध्ये सौ. चित्रलेखा माने - कदम यांच्या हस्ते 'मातृप्रेरणा' विशेषांकाचे प्रकाशन

कोरेगाव : भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सहसंपादिका सौ. मेघना घांग्रेकर यांनी संपादित केलेल्या सांस्कृतिक वार्तापत्र पुणे निर्मित 'मातृप्रेरणा' या विशेषांकाचे प्रकाशन रहिमतपूर येथील पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या चैत्रबन परिसरात भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. चित्रलेखा माने - कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहसंपादिका सौ. मेघना घांग्रेकर, वीरमाता सौ. सुवर्णा शेळके, हर्षवर्धन कदम, सौ. प्रियंका कदम, मार्केटिंग ऑफिसर निखिल वझे, गिरीश बोंद्रे, संदीप पवार, प्राचार्य जे. एन. माने, प्राचार्य पी. पी. वावरे, प्राचार्या डॉ. भाग्यश्री जाधव यांसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सौ. चित्रलेखा माने - कदम म्हणाल्या की, माता ही प्रेरणेचा अखंड वाहणारा स्त्रोत असतो. मातृभूमी आणि माता यांच्यापुढे आपण नतमस्तक होत असतो. माता संस्कार करते, मुलांना घडवते, योग्य वेळी योग्य दृष्टी देते. राजमाता जिजाऊंच्या संस्कारातून छत्रपती शिवाजीराजे घडले. रहिमतपूरच्या सरदार माने घराण्यातील लेकीने म्हणजे महाराणी जमनाबाई गायकवाड यांनी आपल्या संस्कारातून बडोदा संस्थानाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांना घडविले. हिराबा मातेच्या संस्कारातून आपल्या देशाचे विद्यमान पंतप्रधान घडले. अशा कितीतरी विविध क्षेत्रातील प्रेरक माता या विशेषांकाच्या केंद्रस्थानी आहेत. हा विशेषांकाचे मुखपृष्ठ व त्यातील मांडणी उत्तम झाली आहे. अंकातील प्रत्येक लेख वाचनीय आहे. प्रत्येकाने हा अंक संग्रही ठेवावा असाच दर्जेदार झाला आहे. भारतमाता ही आपली माता आहे. भारतीय स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करताना १५ ऑगस्ट रोजी या अंकाचे प्रकाशन होत आहे. हा एक सुंदर योगायोग आहे असे त्यांनी नमूद केले. समाजाला जागृत करणे ही काळाची गरज आहे. ही जागृती या अंकाच्या माध्यमातून होईल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी बोलताना सहसंपादिका सौ. मेघना घांग्रेकर म्हणाल्या की, मातृशक्ती, त्यातून निर्माण होणारी गुणवान संतती एक समर्थ राष्ट्राची खरी संपत्ती असते. पण बदलत्या काळातील अनेक आव्हानामुळे हा 'मातृभाव 'संकटात सापडलेला दिसतो. नव्या आकर्षक संकल्पना त्यामुळे विवाह , मातृत्व नकोच असे वाटणारा वर्ग वाढीस लागणे हे मातृत्वासमोरचे मोठे आव्हान आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी त्याचबरोबर आताच्या



तसेच भावी मातांना प्रेरणा मिळावी यासाठी या कर्तृत्ववान मातांच्या गाथा एकत्र केल्या आहेत. हा विशेषांक निश्चितपणे राष्ट्र व समाज जडणघडणीत उपयोगी पडेल असा आत्मविश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निखिल वझे यांनी केले. संतोष राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर कार्यकर्ते, महिला, नागरिक, प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

# पोलिसात मुख्याधिकारी आशिष चौहान व अधीक्षक पूजा पाटील यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल

**कुरुंदवाड :** येथील पालिका मुख्याधिकारी आशिष चौहान व कार्यालयीन अधीक्षक पूजा पाटील यांच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यासाठी वारंवार निवेदन देवून गुन्हा दाखल न केल्याने सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने येथील पोलिस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. दुपारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस यांनी मुख्याधिकारी आशिष चौहान व कार्यालयीन अधीक्षक पूजा पाटील यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र दोन दिवसांत कारवाई न झाल्यास बेमुदत शहर बंद करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. सुमारे चार तासांहून अधिक काळ आंदोलन सुरु होते. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान अप्पर पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देवून कारवाईबाबत आंदोलकांना समजाविण्याचा प्रयत्न केला मात्र आंदोलक ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने खाटमोडे पाटील निघून गेले.

मात्र माजी आमदार उल्हास पाटील यांनी या ठिकाणी भेट देऊन यशस्वी मध्यस्थी करत पोलीस व आंदोलकांमध्ये तोडगा काढला.

मुख्याधिकारी चौहान व कार्यालयीन अधीक्षक पाटील यांनी शहरवासियांबाबत चुकीचे वक्तव्य करुन अपमानित केल्याचे ऑडीओ क्लिप सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याने शहरवासीयांतून संतापाची लाट उसळली होती. मुख्याधिकारी चौहान व पाटील यांच्या विरोधात शहरात विविध आंदोलने करत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी सर्वपक्षीय कृती समितीने केली होती. मात्र पंधरा दिवस उलटले तरी गुन्हा दाखल न झाल्याने समिती पदाधिकारी यांनी येथील २१ ऑगस्ट बुधवारी पोलिस ठाण्यावर मोर्चा काढून ठिय्या आंदोलन केले. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत उठणार नाही अशी भूमिका आंदोलकांनी घेतली. यावेळी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस यांना आंदोलकांनी चांगलेच धारेवर धरले. सुमारे चार तासांहून अधिक काळ आंदोलन सुरू होते. गुन्हा दाखल केल्याचे बी पार्ट दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी आंदोलनात कृती समिती अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख वैभव उगळे, राजू आवळे, बाबासो सावगावे, दयानंद मालवेकर, बबलू पवार, सुनिल कुरुंदवाडे, आप्पासाहेब भोसले, तानाजी आलासे, किरण गावडे, अण्णापा आवळे, अर्षद बागवान, रघु नाईक,संजय अनुसे, वैशाली जुगळे, राणी कोरे, धनश्री मालवेकर यांच्यासह आदी सहभागी झाले होते.

फोटो मेल करीत आहे

# MPSC ची परीक्षा पुढे ढकलली, नवी तारीख लवकरच जाहीर होणार

**मुंबई:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (MPSC) संदर्भात मोठी बातमी येत आहे. महाराष्ट्रात २५ ऑगस्ट रोजी होणारी एमपीएससी पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्याच्या मागणीसाठी पुण्यात आंदोलन करण्यात येत होतं. मात्र या आंदोलनाला शरद पवारांनी पाठिंबा दर्शविला असून या परिक्षेची लवकरच नवी तारीख जाहिर करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात २५ ऑगस्ट रोजी होणारी एमपीएससी पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्याच्या मागणीसाठी पुण्यात आंदोलन करणाऱ्या उमेदवारांचे राष्ट्रवादी-सपा अध्यक्ष शरद पवार यांनी पाठिंबा दर्शवला होता. त्यांनी आपली भूमिका स्पष्ट न केल्यास आपण (शरद पवार) आंदोलनात सहभागी होऊ, असा इशाराही त्यांनी महाराष्ट्र सरकारला दिला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (MPSC) तयारी करणारे अनेक उमेदवार पूर्व परीक्षेच्या तारखेत बदल करण्याच्या मागणीसाठी मंगळवारी रात्रीपासून आंदोलन करत आहेत. वास्तविक, एमपीएस पूर्व परीक्षेची तारीख बँकिंग परीक्षेशी टक्कर देत आहे. यादरम्यान आता MPSC ची परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला.

राष्ट्रवादी-सपा नेते रोहित पवारही आंदोलनात सहभागी झाले असून ते आंदोलक उमेदवारांसोबत बसले होते. कृषी विभागातील २५८ पदांसाठीची निवडही एमपीएससी परीक्षेवर आधारित असावी, अशी मागणी आंदोलकांकडून केली जात आहे. राष्ट्रवादी-सपा अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर याबद्दल पोस्ट केली.

शरद पवार म्हणाले, एमपीएससी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. मात्र, सरकार त्याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येत आहे.




# तलवार हल्ला प्रकरणातील तीन आरोपींना पकडण्यात यश

**जयसिंगपूर :** शहराचे उपनगर असलेले शाहू नगर येथे १८ ऑगस्ट रोजी झालेल्या जीव घेण्यात तलवार हल्ला प्रकरणातील तीन आरोपींना जयसिंगपूर पोलीस ठाणे कडील गुन्हे शोध पथकाला अथणी तालुक्यातील अनंतपुरा येथून पकडण्यात यश आले अवघ्या तीन दिवसात अट्टल गुन्हेगारांना पकडून जेरबंद केल्याने पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे

याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी सुनील रामाप्पा लमानी रा. नांदणी नाका धरणगुत्ती यांच्यात व विनोद बाबू जाधव रा. लमान वसाहत जयसिंगपूर पैशाच्या देवीघीवरून काही दिवसापूर्वी वाद झाला होता या वादाचा राग मनात धरून १८ ऑगस्ट रोजी दुपारी सुनील लमानी आपल्या आईस श्री मोबाईल शॉपी येथे बोलत थांबला असता विनोद कासू पवार विनोद बाबू जाधव अरविंद बाबू पवार हे मोटरसायकल वरुन येऊन सुनील जाधव यास शिवीगाळ करून तलवारीने हल्ला करत त्याला जखमी करून पळून गेले होते. सदरचा गुन्हा अति संवेदनशील होता गोपनीय बातमीदारांना मिळालेल्या माहितीनुसार जयसिंगपूर पोलीस ठाण्याकडील गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार निलेश मांजरे, ताहीर मुल्ला, मोहसीन कुलकर्णी वैभव सुरवशी यांच्या,पथकाने सापळा रचून अनंतपुरा ता अथणी येथून २१ ऑगस्ट रोजी ताब्यात घेऊन त्यांना अटक केली आहे.

# कॉसमॉस बँकेस युसीबी टॉप १०० सीएक्स्ओ समिट अवॉर्ड्स



**पुणे :** कॉसमॉस बँकेस नुकतेच नॅशनल फेडरेषन ऑफ अर्बन को.ऑपरेटीव्ह बँक्स् अँड क्रेडीट सोसायटीज लि. (नॅफकब) आणि नॅशनल को.ऑपरेटीव्ह युनियन ऑफ इंडिया (एनसीयुआय) या नामांकित संस्थांतर्फे 'युसीबी टॉप १०० सीएक्स्ओ समिट' आणि 'आयकॉनिक लीडर्स अवॉर्ड्स २०२४' या कार्यक्रमात तीन प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. नामांकनप्राप्त एकूण ४८ सहकारी बँकांमधून कॉसमॉस बँकेची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली.

कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांना 'व्हिजनरी लीडर्स' या विषेश पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गतवर्षी कॉसमॉस बँकेने सीए काळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व आघाड्यांवर उत्तम आर्थिक कामगिरी केली आहे. आर्थिक वर्ष २०२३.२४ मध्ये बँकेने रू.३८४ कोटींचा ऐतिहासिक निव्वळ नफा कमावला असून रू.३५००० कोटींचा व्यवसायाचा टप्पा पार केला आहे.

कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापकीय संचालिका सौ. अपेक्षिता ठिपसे यांना बँकेच्या प्रगतीसाठी केलेल्या उ८.श्ट योगदानाबद्दल 'बँकींग बिझनेस लीडरषीप ॲवॉर्ड.सीईओ' हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.

कॉसमॉस बँकेचे तत्कालीन उपाध्यक्ष व सध्याचे संचालक श्री. प्रविणकुमार गांधी यांना बँकेचे उद्दिष्ट् साध्य करण्यासाठी त्यांच्या उत्तम मार्गदर्षक भूमिकेसाठी २०२३.२४ या आर्थिक वर्शातील 'बँकींग लीडरषीप ॲवॉर्ड. व्हाईस चेअरमन' या कॅटेगरीमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्कार सोहळ्यात कॉसमॉस बँकेने सर्व मानाचे पुरस्कार प्राप्त करून सहकारी बँकींग क्षेत्रातील आघाडीची बँक असल्याचे पुन्हा एकदा सिध्द केले आहे.

# आता लाडके गद्दार, लाडके बेईमान अशा योजना आणा: संजय राऊत यांचे मुख्यमंत्र्यांवर टीका

**मुंबई:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीड येथे बोलताना लाडका शेतकरी योजना आणि अभियानाची घोषणा केली आहे. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना टीकेचे लक्ष्य केले आहे. मुख्यमंत्र्यांनी आता लाडका गद्दार, लाडका बेईमान अशा योजना आणाव्या, असा उपरोधिक सल्ला त्यांनी दिला.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत असताना महायुती सरकारने युवकांना रोजगारक्षम बनविण्याचा लाडका भाऊ योजनेची घोषणा केली. आता लाडका शेतकरी ही योजना देखील जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत राज्यभर लाडका शेतकरी अभियान राबवून शेतकरी हिताचे निर्णय घेतले जाणार आहेत. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची मदत, ई पीक पाहणीची सक्ती रद्द करणे, यांचा त्यात समावेश आहे.

लाडकी बहीण, लाडका भाऊ योजनांसह आता लाडका शेतकरी योजनेवरही टीका करताना संजय राऊत म्हणाले की, सध्या मुख्यमंत्र्यांना लाडके गद्दार, लाडके बेईमान अशा योजना अमलात आणण्याची आवश्यकता आहे कारण विधानसभा निवडणुकीनंतर सत्ता गेल्यावर त्यांना आपल्याबरोबर असलेल्या गद्दारांना सांभाळावे लागणार आहे.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा संशयग्रस्त आत्मा**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणानंतर सुरू झालेले पालकांचे आंदोलन हायजॅक करून त्याला राजकीय वळण देण्यात आले, असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपने विरोधकांवर केला आहे. या आरोपावरही राऊत यांनी पलटवार केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संशयग्रस्त आत्मा आहेत. त्यांचा दिवसातला निम्मा वेळ जादूटोणा, तंत्र मंत्र, अंधश्रद्धा यामध्ये जात असतो. त्यांच्या डोक्यात कायम संशयाचे भूत असते. त्यामुळे त्यांना हा संशय येणे स्वाभाविक आहे, असे राऊत म्हणाले. मुख्यमंत्री खोटारडे आहेतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांच्याही अधिक खोटारडे आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. पीडित मुलींच्या आईची तक्रार पोलिसांनी तब्बल दहा तास नोंदवून घेतली नाही. हे देखील विरोधकांनीच केले असे सत्ताधाऱ्यांना म्हणायचे आहे काय, असा सवालही त्यांनी केला. वास्तविक बदलापूर आंदोलनाचे पडसाद राज्यभर सर्वत्र उमटले. याकडे जर उघड्या डोळ्यांनी बघितले तर वस्तुस्थिती काय आहे हे त्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही, असेही राऊत म्हणाले.

# कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी महिला रस्त्यावर उतरणार

**मुंबई :** राज्याला एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री असूनही ते महिलांना न्याय देऊ शकत नाहीत. राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे, यातून लहान मुलीही सुटलेल्या नाहीत. महिलांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेल्या मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी महिला काँग्रेस दंडुके घेऊन रस्त्यावर उतरणार असा इशारा महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांनी दिला आहे.

राज्यातील महिला अत्याचाराच्या एका घटनेत तपास करून दोन महिन्यात आरोपीला फाशी ! असे मुख्यमंत्री शिंदे यांनी काल एका कार्यक्रमात सांगितले. ही घटना कोणती व कोणाला फाशी दिली त्याचा खुलासा करावा व बदलापूरच्या नराधमालाही तातडीने फाशी द्यावी अशी



मागणी त्यांनी केली.

बदलापूरसारख्याच घटना अकोला, नाशिक, ठाणे जिल्ह्यात घडल्या आहेत. राज्यातील महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना व निष्क्रीय सरकार लक्षात घेऊन प्रदेश महिला काँग्रेस प्रत्येक जिल्ह्यात नारी न्याय समिती स्थापन करणार आहे. या समितीत एक महिला वकील व पाच महिला सदस्य असतील, पीडित महिलांना सर्व प्रकारची मदत तसेच समुपदेशन करण्याचे काम ही समिती करेल, अशी माहिती संध्या सव्वालाखे यांनी दिली .

# शिरोळ तालुका अंक विक्रेता संघटनेचा मेळावा संपन्न

**शिरोळ :** १८ ऑगस्ट २०२४ रोजी शिरोळ येथे हरी मंदिरात शिरोळ तालुका वृत्तपत्र विक्रेता व एजंट संघ शिरोळ यांनी मेळावा घेण्यात आला यावेळी इचलकरंजी कोल्हापूर वृत्तपत्र विक्रेते पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले अंक विक्रेता व एजंट यांच्या दिवंगत झालेल्या नातेवाईकांना श्रद्धांजली वाहण्यात आली

वृत्तपत्र विक्रेत्यांची मुले मुली वेगवेगळ्या क्षेत्रात यश संपादित केले बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला त्यांचे प्रथम इचलकरंजी इथून आलेले वृत्तपत्र विक्रेते संघटनेची पदाधिकारी पश्चिम महाराष्ट्र राज्य संघटनेची सल्लागार शिवगोंड खोत (ताल्या) व अण्णासो गुंडे , शिवानंद रावळ व कोल्हापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे पदाधिकारी कोल्हापूर शहर वृत्तपत्र विक्रेतेचे अध्यक्ष माननीय किरण हनुहते , परशुराम सावंत अंकुश परब, राजाराम पाटील व धनंजय शिरोळकर व हातकलंगडे वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटील रूकडी, संतोष दुडुग उपाध्यक्ष यांचे स्वागत शिरोळ तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष रायाप्पा बाळीगीरे धरणगुत्ती यांनी केले

तसेच वृत्तपत्र विक्रेत्याच्या विविध अडचणी श्री धनंजय सावंत शिरोळ तालुका वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे सचिव यांनी मांडले तसेच सर्वात महत्वाचे वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी बोर्ड स्वतंत्र स्थापन करण्यासाठी आचारसंहिता लागायच्या अगोदर आपण सर्वांनी मिळून व सर्व वृत्तपत्र विक्रेता संघटनेने जोरदार प्रयत्न करण्याचे नियोजन कसे करायचे व आपल्या वृत्तपत्र विक्रेताराज्य संघटनेचे ऑनलाइन सभासद नोंदणी सर्व वृत्तपत्र विक्रेता व एजंटानी करण्याची ठरवले.

त्यामध्ये शिरोळ तालुका वृत्तपत्र विक्रेतेचे पदाधिकारी युवराज पाटील मेजर (तंमदलगे ) चिदानंद कांबळे (शिरोळ) सुकुमार पाटील जयसिंगपूर शिरोळ तालुका वृत्तपत्र विक्रेते व एजंट अनिल कोरे (जयसिंगपूर ) रमेश चव्हाण (चिपरी) कलया जंगम (जयसिंगपूर) विशाल पवार (संभाजीपूर) जयसिंगपूर विनोद कांबळे (जयसिंगपू) आगर सतीश अनंतपुर (जयसिंगपूर )मनोहर पाटील (कुटवाड) संजय कांबळे (कनवाड) यशवंत जमखंडीकर (नरसिंहवाडी) सुरेश गुरव (अकिवाट) सुभाष इंगळे (कोथळे) प्रथमेश इंगळे (उमळवाड) धवल कुमार खडके (कारखाना) अगर शिरोळ रणजीत पुदे शिरोळ राकेश परीट (शिरटी) तसेच शिरोळ तालुक्यातील वृत्तपत्र विक्रेते व एजंट उपस्थित होते.

# अजित पवार गटाकडून नितीन पाटील यांना राज्यसभेवर संधी

**सातारा :** सातारा जिल्ह्याला खासदार उदयनराजे यांच्यानंतर सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन काका पाटील यांच्या रूपाने आणखी एक खासदार मिळणार आहे. महाराष्ट्रात राज्यसभेच्या दोनपैकी एका जागेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या कोट्यातून नितीन पाटील यांना संधी देण्यात आली आहे. त्यांच्या उमेदवारीने वाई तालुक्यासह जिल्ह्यात विशेषतः नितीन पाटील समर्थकांत आनंदाचे वातावरण आहे.

लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान नितीन पाटील यांना खासदार करतो, असा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वाई येथील सभेत दिला होता. लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान सातारा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा उमेदवार उभा राहील, अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने घेतली होती.



महायुतीत सातारा लोकसभा मतदारसंघ भाजपच्या वाट्याला आल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या बदल्यात राज्यसभेची जागा भाजपकडे मागितली होती. ही जागा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला मिळाली असून, या जागेवर आता नितीन पाटील यांची वर्णी लागणार आहे. त्यामुळे वाईसह राष्ट्रवादीच्या गोटात आनंद द्विगणित झाला आहे.

अजित पवारांनी केली वाईकरांची अपेक्षापूर्ती

खासदार उदयनराजे भोसले यांच्या वाई येथील सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा, मी नितीन पाटील यांना खासदार करतो, असा शब्द दिला होता. हा शब्द पाळत अजित पवार यांनी वाईकरांची अपेक्षापूर्ती केली आहे.

नव्या राजकीय इनिंगला सुरुवात

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत नितीन पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीला अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. राज्यसभेच्या निमित्ताने नितीन पाटील यांची नवी राजकीय इनिंग सुरू होत असून सातारा जिल्ह्याला पाटील यांच्या रूपाने दुसरा खासदार मिळाला आहे.

# बदलापूरच्या घटनेविरोधात पुण्यात सुप्रिया सुळेंच्या नेतृत्वात आंदोलन

**पुणे :** ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये चिमुरड्या मुलींवर अत्याचार करण्यात आले. अवघ्या चार वर्षांच्या मुलींवर शाळेमध्ये अत्याचार केल्यामुळे बदलापूरकर संतप्त झाले आहेत. पोलिसांनी तक्रारीची दखल न घेता उलट मुलींच्या पालकांना पोलीस स्टेशनमध्ये बसवून घेतल्यामुळे संतापाची लाट उसळली. दिवसभर आंदोलकांनी या घटनेच्या विरोधात बदलापूर स्थानकावर चक्काजाम केला. या प्रकरणाचे पडसाद आता पुण्यामध्ये उमटू लागले आहे. पुण्यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाने या घटनेच्या निषेधार्थ आंदोलन केले आहे. या आंदोलनस्थळी खासदार सुप्रिया सुळे देखील उपस्थित आहेत.

बदलापूरमध्ये अत्याचाराची घटना झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने योग्य पाऊले उचलली नाहीत. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विरोधकांनी टीकास्त्र डागलं आहे. पुण्यामध्ये शरद पवार गटाने खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन छेडले आहे. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह सर्व कार्यकर्ते आक्रमक भूमिका घेताना दिसत आहे. शरद पवार गटाच्या सर्व नेत्यांनी महायुतीच्या राज्य सरकारवर जहरी टीका केली आहे. तसेच या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी घोषणाबाजी केली आहे.

या आंदोलनावेळी संतप्त राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी गुडलक चौकामध्ये रस्त्यांवर बसून ठिय्या मांडला. हातामध्ये पोस्टर घेत बदलापूर प्रकरणातील नराधमाला फाशीची शिक्षा द्या अशी घोषणाबाजी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्या' तसेच 'महिला आयोग हाय हाय' अशी घोषणाबाजी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. महिलांना न्याय मिळालाच पाहिजे, चिमुकल्यांना न्याय द्या अशी घोषणाबाजी शरद पवार गटाने केली आहे. तसेच या घटनेबाबत 'एकनाथ शिंदे जबाब दो' अशी मागणी देखील आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

या आंदोलनावेळी सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. खासदार सुळे म्हणाल्या, हे सरकार फक्त खुर्ची प्रिय सरकार आहे . सरकारला सर्वसामान्य मायबाप जनता, महागाई, बेरोजगारी, यात अजिबात रस नाही.१२ ते १८ तास पालक केस रजिस्टर करायला वनवन फिरत होते. हे आंदोलन झालं नसतं तर ही घटना कधीच बाहेर आली नसती. मी माध्यमांचे आभार मानते.